Vol II Issue VIII Feb 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 8, Feb. 2013
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# भेंडवळची कृषिमांडणी

पी. आर. पुंडकर

महात्मा फुले महाविद्यालय, वरूड
जि. अमरावती

**सारांश**

लोकसाहित्याचा अभ्यास हा परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनाचा अभ्यास असल्यामुळे परंपरेने चालत आलेल्या जीवन अवशेषाचा आधुनिक प्राचीनांचा अभ्यास ठरतो. लोकजीवनातील अनेक लोकपरंपरा विश्वसनीय आहेत. पण ही विश्वसनीयता अभ्यासकांच्या समाजशास्त्रीय जाणिवांच्या स्वरूपावर अवलंबून आहे. त्यापैकी एक लोकज्योतिर्विद परंपरा म्हणजे विदर्भातील भेंडवळची मांडणी ही होय.

## प्रस्तावना :

'शेती हा भारतीय लोकजीवनाचा मूलाधार आहे. त्यामुळ बहुतेक लोकपरंपरा हया कृषिवर आधारित आहेत. लोकजीवनातील त्या त्या काळाचे प्रतिबिंब लोकसाहित्यातून उमटलेल असते. लोकगीते, लोककथा, लोकनाटय, जादूटोणा, तंत्रमंत्र, संस्कार, लोकोत्सव, व्रतअनुष्ठाने, लोकनृत्य, लोकसंगीत, चित्रकला, शिल्पकला, लोकवैद्यक, लोकज्योतिर्विद परंपरा इत्यादी परंपरांनी पंचमहाभूतांशी सलगी करून त्या विराट विश्वातील रहस्याचा वेध घेण्याचा सतत प्रयत्न केला आहे. लोकमानसाने कधी अद्‌भुताची कास धरली तर, कधी सत्याचा ध्यास घेतला. लोकसंस्कृती प्रकृती आणि विकृतींना सामावून लोकपरंपरा दृढमूल झालेल्या आहेत. डॉ. मधुकर वाकोडे यांनी याबाबत म्हटले आहे ''लोकमानसाला जे भावल ते त्यांनी अणघडपणे व्यक्त केल. यांनाच शास्त्रधारी आणि लोकधारी असे म्हणतात''[1]

## लोकज्योतिर्विद परंपरा –

लोकजीवनात भविष्यकथन करणारा पूर्वापार असा एक वर्ग आहे. 'सुख पाहता जवा पाडे, दुःख पर्वताएवढे' या न्यायाने प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात दुःख जास्त आहे म्हणून तो सुखाचे क्षण शोधत असतो. यासाठी कधी कधी तो आपल भविष्य जाणून घेतो. या मानवी स्वभावाचा फायदा सरोदी, कुडमुडे जोशी घेतात.

ग्रामीण लोकजीवन मुख्यतः शेतीवर अवलंबून असल्याने पर्जन्यनिदान आणि पिकपाणी विषयक अनुमान घेण्याची उत्कट लालसा शेतक–याच्या ठिकाणी असणे स्वाभाविक आहे. ही लालसा पूर्ण करण्यासाठी कितीतरी विधी ग्रामीण भागात पार पाडल जातात. ग्रामीण ज्योतिष्यशास्त्र परंपरेत सहदेव भाडळीचे महत्व प्राचीन काळापासून आहे.

## भेंडवळची मांडणी–

बुलढाणा जिल्हयातील भेंडवळची लोकज्योतिर्विद परंपरा अलौकिक अशी लोकपरंपरा आहे. ही परंपरा कृषिव्यवस्थेतील प्रगल्भ आविष्कार आहे. यात हवामान, पिकपाणी, रोगराई, तेजीमंदी, भौतिक आणि आधिभौतिक संभाव्य घटनासंबंधी भाकीत होते.

कृषिचे भवितव्य ज्या दृष्टीवर अवलंबून आहे. त्या दृष्टीसंबंधी समूहपणे उभी केलेली एक आगळी वेगळी सृष्टी म्हणजे भेंडवळची मांडणी आहे. डॉ. मधुकर वाकोडे 'मांडणी' विषयी म्हणतात ''एखादी कृती शास्त्रीय पद्वतीने रचणे, व्यवस्थित लावणे म्हणजे मांडणी''[2] होय.

भेंडवळची मांडणी दीड–दोनशे शतकापूर्वी होऊन गेलेल्या चंद्रभान महाराज यांनी सुरू केली. चंद्रभान महाराज हे [3]शेतकरी तसेच आध्यात्मिक प्रवृत्तीचे गृहस्थ होते. आज त्यांच्याच घरातील लोक ही परंपरा चालवित आहेत.

चंद्रभान महाराजाविषयी काही आख्यायिका येथे प्रचलित आहे की त्यांना निसर्गाचा अभ्यास होता. चंद्रभान महाराजांना एकदा शेतात झाडाखाली बसले असतांना झाडावरील निळावंती आणि तिचा जोडीदार यांचे संवाद कळले. त्यांना पक्षाची बोली कळत असे.

आज अवशेष रूपात ही विद्या त्यांच्या घराण्यात टिकून आहे. आता श्री रामदास महाराजांचा मुलगा पुंजाजी वाघ ही मांडणी करून भाकीत रचतो.

## मांडणीतील घटक–

भेंडवळची मांडणी ही दरवर्षी अक्षयतृतीयेला केली जाते. या निसर्गधिष्ठित मांडणीत अनेक घटक कार्यरत असतात.

Title : भेंडवळची कृषिमांडणी
Source:Golden Research Thoughts [2231-5063] पी. आर. पुंडकर yr:2013 vol:2 iss:8

गावाशेजारील आखरात आणि ठराविक परिसरात सहा–सात मानकरी अनवाणी पायाने विशिष्ट जागेची साफसफाई करतात,'चंद्रभान महाराज की जय' असा जयजयकार करून गोल साफ करतात. त्यात मधोमध खड्डा खोदतात. खड्डयातील माती घटाबाहेर फेकतात. त्यात मधोमध खड्डा खोदतात. खड्डयातील माती घटाबाहेर फेकतात. खड्डयातील सारखे चार ढेकळ काढतात त्याला सारखे करतात. ही चार ढेकळ म्हणजे सांकेतिक भाषेत वर्षा ऋतुतील चार मास जून, जूलै, ऑगष्ट आणि सप्टेंबर होत. पाणी भरलेले गाडगे हे त्या चार ढेकळांना स्पर्श करेल या पध्दतीने त्यावर ठेवतात. त्याला सांकेतिक नाव समुद्र असे आहे. गाडग्याच्या समोर पूर्वेस पानावर सुपारी आणि एक नाणे ठेवतात. सांकेतिक भाषेत पान म्हणजे गादी, सुपारी म्हणजे राजा आणि नाणं म्हणजे अर्थव्यवस्था, संपत्ती होय. गाडग्यावर पुरी ठेवली जाते. सांकेतिक भाषेत त्याला पृथ्वी संबोधतात. पुरीवर पापड, वडा ठेवतात. त्यालाच जनावरांचा चारा, कडबा, कुटार संबोधतात. पुरीवर एक करंजी ठेवतात. करंजी हे संपत्तीचे प्रतीक मानतात. चार ढेकळांच्या मधातील पोकळी म्हणजे अवकाळी पाणी असे दर्शविते.

### *धान्यरास मांडणी–*

घटात खड्डयापासून काही अंतरावर पश्चिम दिशेस अंबाडीची रास मांडली जाते. मांडणीच्या परंपरेत अंबाडीला अग्रस्थान आहे. कारण अंबाडीला आदिमाया 'अंबा' मानतात. त्यानंतर अठरा धान्यराशीचा क्रम परंपरेनुसार असतो. त्यात बदल होत नाही. एका लांब पागोट्यात कसणीप्रमाणे ही अठरा धान्ये क्रमानुसार बांधलेली असतात. त्या क्रमानुसार त्यांची मांडणी होते. 1) अंबाडी 2) सरकी 3) तूर 4) ज्वारी 5) मूग 6) उडीद 7) तीळ 8) भादली 9) बाजरी 10) धान 11) जवस 12) मूगहिवाळी 13) लाख 14) वाटाणा 15) गहू 16) हरबरा 17) करडी 18) मसूर

तारकांच्या पूजाप्रमाणे घटातील धान्यराशींची मांडणी दिसते. या धान्य राशीतील करडीला भारतीय सैन्य आणि मसूर म्हणजे मुसलमान अर्थात पाकिस्तान सांकेतिक भाषेत समजतात. धाण्यराशींची वर्तुळाकार मांडणी करतांना काही पथ्य पाळली जातात. उदा. घटात पादत्राणे नेत नाहीत. विशिष्ट धान्याची रास मांडतांना ओंजळीतून दाणा पडणार नाही याची दक्षता घेतात. अंबाडीपासून धान्य राशी मांडतात. साधुबुवांनी धान्य राशी मांडल्यानंतर कुणीही धान्यास स्पर्श करीत नाही. फक्त फैलावलेल दाणे काडीने राशीवर व्यवस्थित रचतात. नंतर मावळत्या सूर्यास पाच वेळा दंडवत घालून मानकरी घराकडे परततात.

या मांडणीचे वैशिष्ट्य असे की, ही मांडणी उघड्यावर असते. कुठेही सुरक्षा कठडे किंवा रखवालदारही नसतो. आजपर्यंत कधीही ही मांडणी उधळली गेली नाही. अक्षय तृतीयेच्या दुसऱ्यादिवशी विनायकीचतुर्थीला सूर्योदयापूर्वी भल्या पहाटे निसर्गअभ्यासक श्री पुंजाजी महाराज वाघ सूक्ष्म निरीक्षण करतात. हजारो शेतकरी येथे जमलेले असतात. पर्जन्य निदान, पिकपाणी अनुमान, भविष्यकथन ऐकण्यासाठी लोक उत्सुक असतात.

### *भविष्यकथन–*

घटमांडणीचे येत्या वर्षभराचे भाकीत 25 एप्रिल 2012 रोज बुधवारला श्री रामदास महाराज व त्यांचे पुत्र पुंजाजी वाघ व सारंगधर वाघ यांनी हजारो शेतकऱ्याच्या उपस्थितीत उघड केले. सर्वप्रथम अंबाडी हे पिक शेतकऱ्याचे दैवत समजल्या जाते. या पिकाच्या बियाण्याच्या गंजीतील काही दाणे घटाच्या आतल्या दिशेने सरकल्याने दैवताचा शेतकऱ्यावर मोठ्या प्रमाणात कोप राहणार असे सांगितल. सरकी (कापूस) हे विदर्भातील नगदी पिक आहे. सरकीची गंजी घटात कायम होती. त्यामुळे हे पिक मोघम म्हणजे अनिश्चित राहील. तर ज्वारी हे पिक उत्तम येईल. तूर, मूग, उडीद व तीळ यांच्या बियाण्याच्या गंज्या कायम, तर भदलीचे दाणे विखुरलेले असल्याने गुरे, पिके व मानवावर रोगराई येईल. बाजरीचे काही दाणे घटाच्या आत सरकल्याने हे पिक साधारण चांगल. लाखाचे काही दाणे घटात विखुरलेले होते. त्यामुळ लाख हे पिकसुद्दा उत्तम येईल. करडी हे पिक तेलवाण असले तरी करडी म्हणजे देशाचे शिपाई संबोधल्या जाते. त्यामुळे संरक्षण व्यवस्था मजबूत व पिक चांगल येईल. मसूर म्हणजे शेजारी शत्रू राष्ट्र पाकिस्तान) मानण्यात येते. उत्तरेकडील भागात शत्रूच्या कारवाया वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली. परंतु संरक्षण व्यवस्था मजबूत असल्याने देशाला फारसा धोका नाही.

घटाच्या मधोमध 2 फुट लांब, रूंद खड्डयामध्ये त्यातीलच चार मातीचे ढेकल ठेवलेली असतात त्यावर कोरं मातीच भांड (मडक) पुरी, साडोई, कुरवडी व करंजी हे खाद्यपदार्थ ठेवले होते. भांड्याच्या वरील पूरीला पृथ्वीचं प्रतीक मानतात. आणि सांडोई व कुरवडी हे गुरांच्या चारा–पाण्याच प्रतिक मानतात. करंजी हे संपत्तीचे प्रतीक मानतात. यंदा पुरी घटातून गायब होती. त्यामुळे पृथ्वीवर काही भागात भूकंप, त्सुनामीसारखी संकटे येतील. सांडोई, कुरवडी हे खाली पडून फुटलेली असल्यामुळे गुरांच्या चारापाण्याचे नुकसान होऊन टंचाई निर्माण होणार, तसेच करंजीसुद्दा खाली पडून फुटलेली होती. त्यामुळ देशात चलन तुटवडा होईल. असे भाकीत वर्तविण्यात आले.

यावर्षीची मांडणी थोड्या प्रमाणात पिकपाण्यासंदर्भात चांगली राहील असे सांगण्यात आले. तसेच कोणतेही धान्यराशी घटाच्या बाहेरील व आतील भागात विखुरलेल नसल्याने पिकाचे भाव कसे असतील मोघम) हे सांगता येत नाही. परंतु गेल्या वर्षीच्या तुलनेत शेतऱ्याच्या दृष्टीने हे वर्ष चांगल असेल असे सारंगधर पाटील व पुंजाजी महाराज वाघ यांनी सांगितले.

### *मांडणीसाठी व्रतस्थ –*

श्री चंद्रभान महाराज वाघ यांच्या परिवारातील एक व्यक्ती दरवर्षी एक महिण्ना जंगलात राहून स्वतःचे अन्न आट्यामध्ये गोमूत्र टाकून त्याची पोळी करून खात असतात. कोण्या स्त्रीची सावली सुद्दा पडू दयायचे नाही. सध्या रामचंद्र वाघ हे परंपरा चालवत होते. त्यांचे वय झाल्यामुळे आता त्याचे पूत्र पुंजाजी वाघ हे व्रतस्थ जीवन जगत आहेत.

पुजाजी महाराज वाघ आणि त्यांची चमू गुढीपाडव्यास मारोतीच्या मंदिरावर नवग्रहाची मांडणी प्रथम करतात. रवा भरलेला घट पाण्याच्या पा़त्रात उपडा मारतात. स्वतः पुंजाजी वाघ नऊ दिवस भटकंती करतात. या नऊ दिवसात ते फक्त गोमुत्रात भिजविलेल्या आटयाची चपाती खातात. आणि रामनवमीची सांगता झाल्यावर नऊ दिवसातील अश्विनी, भरणी, कृतिका, रोहिणी, मृगशीर्ष, आर्द्रा, पुनर्वसु, पुण्य, आश्लेषा इत्यादी पावसाळी नक्षत्राचे सूक्ष्म निरीक्षण करतात. आणि अक्षयतृतीयेला मांडणी करतात.

एकूणच भरताला गर्ग, पराशर, काश्यप आदि लोक ज्योतिर्विद कलेची परंपरा लाभली आहे.ग्रामीण लोकजीवनातील सामान्यजन आपल्या नित्याच्या अनुभवावरून हवामान विषयक काही निश्चित स्वरूपाचे अंदाज तयार करून त्याचा कृषिव्यवसायासाठी उपयोग करून घेतात. भेंडवळची कृषिमांडणी ही सुध्दा अशीच कृषकासाठी घडणाऱ्या घटीताचे भाकीत आहे.

### *संदर्भ*

1) डॉ. मधुकर वाकोडे ‘लोकधाटीच्या वहिवाटी’, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्रथमावृत्ती 2005, पृ. 65
2) डॉ. मधुकर वाकोडे – तत्रैव पृ. 66
3) डॉ. प्रभाकर मांडे – ‘लोकरंगभूमी’, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद दुसरी आवृत्ती    पृ. 168
4) डॉ. प्रभाकर मांडे – ‘लोकमानस–रंग आणि ढंग’, प्रथमावृत्ती 2000, पृ.102

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net